शाळा मान्यता आदेश

## नमुना २

क्र भंजिप शिविप्रा/आर.टी.ई मान्य./ 1822 / २०२२
कार्यालय शिक्षण विभाग प्राथमिक जि प भंडारा
दिनांक 26/4/२०२२

व्यवस्थापक :- महर्षी शिक्षण संस्था

विषयः- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम ४ अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

मा महोदय/महोदया,

आपल्या दिनांक १९/४/२०२२ च्या अर्जाच्या संदर्भात अणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी या आधारे

मी एम.एम.बारस्कर शिक्षणाधिकारी प्राथमिक दिनांक .१/५/२०२२ पासून दिनांक ३०/४/२०२५ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ते ८ करीता महर्षी विदया मंदीर अशोक नगर ता. भंडारा जिल्हा भंडारा या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खाली शर्तीच्या / पूर्ततेच्या अधिन आहे.**

१)मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र १) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ ( जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील
३). शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत विदयार्थी संख्येच्या किंवा २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्रारंभीक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्ताच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४) परिच्छेद तीन मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतीपूर्ती मिळेल अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५) संस्था/शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही.आणि कोणत्याही छाननी पदध्तीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तीच्या मातापीत्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही
६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म ,जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.
७) ( १) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही. किंवा प्रारंभीक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढुन टाकण्यात येणार नाही.
( २) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
( ३) कोणत्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(४). प्रारंभिक पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(५) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विदयार्थांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल
( ६ )अधिनियमाच्या कलम २३ ( १) अन्वये निर्धारीत केलेली किमान अहर्ता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अहर्ता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अहर्ता पाच वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(७) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील

(८) शिक्षकाने / शिक्षीकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये याची सुनिश्चीता शाळा करील.

८)शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील

९ )शााळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील
मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालिलप्रमाणे होत्या

* शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ १५७९९.२४ **चौ. मिटर**

*एकुण बांधकाम क्षेत्र १८४२ **चौ. मिटर**

*खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ १२७९९.२४ **चौ. मिटर**

* वर्गखोल्यांची संख्या - ६०

* कार्यालय नि- भांडारा नि- मुख्याध्यापकाची खोली - ०८

* मुलामुलीसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल - **आहे**

* पिण्याच्या पाण्याची सुविधा - बोरवेल

दुपारी जेवन शिजवण्यासाठी स्वयंपाक घर - लागु नाही

* अध्यापन, अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता - **आहे**

* वाचन साहित्य वाचण्यास उपलब्ध - **आहे**

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या परिसरात किंवा ईतरत्र चालविता येणार नाहीत

१२) शाळेची ईमारत किंवा ईतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० ( १८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थामार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या , गटाच्या , किंवा व्यक्तिसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेख सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षीत व प्रमाणित करुन घ्यावे आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्र तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारीकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक २७१००११०७०४असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा. याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनाचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नुतनीकरण असल्यास (state/CBSE) त्याबाबत सुनिश्चीती करावी

१९) जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत

* **आर टी ई २००९ नुसार शाळेत भौतीक सुविधा गट शिक्षणाधिकारी यांचेशिफारसीवरुन पुर्ण असल्याचे अटीवर अधीन राहून मान्यता देण्यात येते.**

(मनोहर बारस्कर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद भंडारा